PLATINUM.

**Date: 06.09.2024**

To,
Listing Department
National Stock Exchange of India Limited
("NSE")
Exchange Plaza, C-1 Block G, Bandra Kurla
Complex Bandra [E], Mumbai – 400051.
NSE Scrip Symbol: PLATIND
ISIN: INE0PT501018

To,
Listing Department
BSE Limited ("BSE")
Department of Corporate Services
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Fort, Mumbai - 400 001.
BSE Scrip Code: 544134
ISIN: INE0PT501018

**Sub.: Newspaper Advertisement for Notice of the 04th AGM**

Dear Sir/Ma'am,

In compliance with Regulation 30 and 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed herewith the copies of newspaper advertisement published by the Company on Friday, 06th September, 2024 regarding completion of Dispatch of Notice of 04th Annual General Meeting and Annual Report for FY 2023-24 of the Company to the Shareholders through Email on 05th September, 2024 and information relating to E-voting.

The Notice of the 04th AGM has been published in the following newspapers:

1. Financial Express (All edition) - English
2. Loksatta (Mumbai edition) - Marathi

You are requested to take the same on your records.

Thanking You,

Yours Faithfully,

**For Platinum Industries Limited**

Bhagyashree Mallawat
Digitally signed by Bhagyashree Mallawat
Date: 2024.09.06 12:57:58 +05'30'

**Bhagyashree Mallawat**
**Company Secretary and Compliance Officer**
**M. No.: A51488**

**Enclosed: as above**

PLATINUM INDUSTRIES LIMITED
(Formerly Known as PLATINUM INDUSTRIES PRIVATE LIMITED)
CIN: U24299MH2020PLC341637
Unit No. 841, Building No. 8, Solitaire Corporate Park, Chakala, Andheri (E), Mumbai-400093, Maharashtra
Tel: 022 49732818 / 022 28390688 / 97 / 98 Mail: info@platinumindustriesltd.com

# भारतासाठी ‘इंटरपोल’च्या १०० रेड कॉर्नर नोटिसा

**पीटीआय, नवी दिल्ली**

**भारताच्या मागणीनुसार** इंटरपोलने २०२३ मध्ये १०० रेड कॉर्नर नोटिसा जारी केल्या आहेत. ही एका वर्षातील सर्वाधिक संख्या आहे, अशी माहिती सीबीआयचे संचालक प्रवीण सूद यांनी गुरुवारी दिली.

प्रवीण सूद पुढे म्हणाले, आम्ही जगभरातील पोलीस दलांना भारतीय एजन्सींना हव्या असलेल्या आणि सीमेपलीकडे राहणाऱ्या फरारी लोकांना ताब्यात घेण्यास सांगितले आहे. इंटरपोल आणि आंतरराष्ट्रीय कायदा अंमलबजावणी भागीदारांच्या मदतीने २०२३ मध्ये २९ आणि २०२४ मध्ये १९ गुन्हेगारांना भारतात परत आणण्यात आले आहे. सीबीआयच्या ग्लोबल ऑपरेशन सेंटरने २०२३ मध्ये १७,३६८ आंतरराष्ट्रीय साहाय्य विनंत्या हाताळल्या आहेत.

भारतीय कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना हवे असलेले गुन्हेगार आणि फरारी लोकांवर इंटरपोलने १०० रेड कॉर्नर नोटिसा जारी केल्या आहेत. इंटरपोलची रेड नोटीस म्हणजे केवळ अटक वॉरंट नाही. उलट या माध्यमातून प्रत्यार्पण आणि आत्मसमर्पण यांसारख्या कायदेशीर कारवाईसाठी हव्या असलेल्यांना शोधून त्यांना अटक करण्याची मागणी जगभरातील कायदा अंमलबजावणी संस्थांकडे केली जाते, अशी माहिती सूद यांनी यावेळी दिली.

# भारतात अनेक सिंगापूर निर्माण करण्याचा ध्यास

## दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

**पीटीआय, सिंगापूर**



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेंन वाँग यांनी सेमिकंडक्टर बनवणाऱ्या कंपनीला भेट दिली.

**विकसनशील देशांसाठी** सिंगापूर प्रारूप हे प्रेरणा देणारे आहे. भारतात अनेक सिंगापूर निर्माण करण्याची इच्छा आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले. या दृष्टीने आम्ही प्रयत्न करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

मोदींनी सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेंन वाँग यांच्याशी चर्चा केली. सिंगापूर हा केवळ भागीदार देश नसून, प्रत्येक विकसनशील देशांसाठी तो प्रेरणादायी असल्याचे स्पष्ट केले. वाँग यांनी या वर्षी मे महिन्यात पदभार स्वीकारला आहे. मोदींनी त्यांच्या नेतृत्त्वाचे कौतुक करत, त्यांच्या नेतृत्वात सिंगापूरची भरभराट होईल असा विश्वास व्यक्त केला. सिंगापूरमधील साडेतीन लाख भारतीय वंशाचे नागरिक हा भक्कम द्विपक्षीय संबंधाचा पाया आहे. गेल्या दहा वर्षांत व्यापारात दुप्पट वाढ, सिंगापूरचे सतरा उपग्रह भारतातून सोडण्यात आले आहेत. या बाबींतून द्विपक्षीय संबंध अधोरेखित होत असल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले.

### सिंगापूरच्या अध्यक्षांशीही चर्चा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिंगापूरचे अध्यक्ष थरमन शण्मुगरथम यांच्याशीही चर्चा केली. कौशल विकास, तंत्रज्ञान तसेच पायाभूत सुविधांमध्ये द्विपक्षीय संबंधांतून कशी प्रगती करता येईल याबाबत विचारविनिमय करण्यात आला. सिंगापूरच्या अध्यक्षांशी उत्तम चर्चा झाल्याचे पंतप्रधानांनी स्पष्ट केले. भारतीय वंशाचे थरमन हे सिंगापूरचे नववे अध्यक्ष आहेत. दोन देशांमधील दीर्घकालीन मैत्री ही विश्वास, परस्पर आदर यावर अवलंबून आहे. तंत्रज्ञान तसेच उत्पादन क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये सहकार्य अधिक कसे वाढविता येईल याबाबतही विचार करण्यात आली. तसेच सिंगापूरच्या अध्यक्षांना पुढील वर्षी भारतभेटीचे आमंत्रणही त्यांनी दिले.

### दहशतवादाविरोधात खंबीर भूमिका

**स्थैर्य व शांततेला दहशतवादाचा धोका आहे. सर्वच प्रकारच्या दहशतवादाचा दोन्ही देशांनी कठोर शब्दांत निषेध केला. संयुक्त निवेदनात दहशतवादाचे कोणत्याही प्रकारचे समर्थन केले जाणार नाही. सुरक्षा आणि सुबत्ता यासाठी दहशतवाद संपवणे गरजेचे आहे. दक्षिण चीन समुद्रात जलवाहतुकीचे स्वातंत्र्य अधोरेखित करण्यात आले. याचा अप्रत्यक्ष संबंध चीनशी आहे. चार सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.**

# ‘हसीना यांनी भारतात मौन बाळगावे!’

## भारत- बांगलादेश संबंधासाठी राजकीय विधाने टाळण्याचा मोहम्मद युनूस यांचा सल्ला

**पीटीआय, ढाका**



**बांगलादेशच्या माजी** पंतप्रधान शेख हसीना यांनी भारतातून राजकीय टिप्पणी करणे चुकीचे असून बांगलादेश जोपर्यंत प्रत्यार्पणाची मागणी करत नाही, तोपर्यंत दोन्ही देशांना होणारी अस्वस्थता टाळण्यासाठी हसीना यांनी मौन बाळगले पाहिजे, असे प्रतिपादन बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी केले.

बांगलादेश सरकार जोपर्यंत हसीना यांना परत पाठविण्याची मागणी करत नाही, तोपर्यंत त्यांना गप्प बसावे लागेल, असे युनूस म्हणाले. भारतात राहून राजकीय टिप्पणी केल्याने दोन्ही देशांच्या मैत्रीपूर्ण संबंधांना बाधा पोहोचू शकते, असे युनूस यांनी सांगितले.

ढाका येथील अधिकृत निवासस्थानी पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत युनूस यांनी भारताबरोबरच्या दृढ संबंधांना महत्त्व दिले. शेख हसीना यांना नक्कीच पुन्हा बांगलादेशमध्ये आणले जाईल. मात्र भारत आणि बांगलादेश यांच्यातील द्विपक्षीय संबंधांना आम्ही महत्त्व देतो. पण भारताने अवामी लीग वगळता इतर राजकीय पक्षांना केवळ इस्लामवादी या चष्म्यातून पाहणे बंद करावे किंवा या अपप्रचाराच्या पुढे जाणे आवश्यक आहे. शेख हसीनाशिवाय बांगलादेश अफगाणिस्तान होईल, हा अपप्रचार आहे, असे युनूस म्हणाले.

‘‘बांगलादेशमध्ये सरकारविरोधात आंदोलन करताना हिंसाचार करणाऱ्या आणि निष्पाप नागरिकांचे बळी घेणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी,’’ असे विधान हसीना यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. याबाबत युनूस यांनी नाराजी व्यक्त केली. ‘‘भारतात आश्रयास असलेल्या हसीना यांनी तिथून प्रचार करू नये. त्या काही भारत दौऱ्यावर गेलेल्या नाहीत, तर जनतेने उठाव केल्यानंतर जनक्षोभ लक्षात घेऊन त्या पळून गेल्या आहेत. त्यामुळे भारतात बसून त्यांनी इथल्या घडामोडींवर सल्ले देऊ नयेत. भारत व बांगलादेश यांच्यातील संबंधांसाठी ते चांगले नाही. हसीना यांच्या विधानाबाबत आमच्या मनात अस्वस्थता आहे,’’ अशी भावना युनूस यांनी व्यक्त केली.

### जो बायडेन यांच्याकडून चिंता व्यक्त





**वॉशिंग्टन : अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी गेल्या आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला असून बांगलादेशी नागरिकांच्या सुरक्षिततेबद्दल आणि तेथील लोकशाही संस्थांच्या भवितव्याबद्दल चिंता व्यक्त केली, असे व्हाइट हाऊस प्रशासनाने सांगितले. व्हाइट हाऊसचे राष्ट्रीय सुरक्षा संपर्क सल्लागार जॉन किर्बी यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत सांगितले की, बायडेन आणि मोदी यांनी बांगलादेशातील अलीकडील घडामोडींवर सामायिक चिंता व्यक्त केली. २६ ऑगस्टच्या आवाहनानंतर व्हाइट हाऊसने जारी केलेल्या निवेदनात बांगलादेशचा उल्लेख नाही. तथापि मोदींनी ‘एक्स’वरील पोस्ट आणि त्यांच्या कार्यालयाने जारी केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की दूरध्वनी संभाषणादरम्यान बांगलादेशवर चर्चा झाली.**

# चित्रपट समीक्षक अरुणा वासुदेव यांचे निधन

**पीटीआय, नवी दिल्ली**



**ख्यातनाम चित्रपट** समीक्षक आणि लेखिका अरुणा वासुदेव यांचे गुरुवारी वयाच्या ८८ व्या वर्षी वृद्धापकाळाशी संबंधित आजारांमुळे नवी दिल्लीतील रुग्णालयात निधन झाले. ‘आशियाई सिनेमाची जननी’ अशी अरुणा यांची ओळख होती.


गेल्या काही दिवसांपासून अरुणा वासुदेव या आजारी होत्या. अल्झायमर आणि वृद्धापकाळाशी संबंधित आजारांमुळे त्या त्रस्त होत्या. गेल्या तीन आठवड्यांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र उपचारांना प्रतिसाद देत नसल्याने गुरुवारी सकाळी त्यांचा मृत्यू झाला, अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीय नीरजा सरीन यांनी दिली.

अरुणा यांचा विवाह दिवंगत राजनैतिक अधिकारी सुनील रॉय चौधरी यांच्याशी झाला होता. त्यांच्या पश्चात ग्राफिक डिझायनर कन्या यामिनी रॉय चौधरी आणि जावई राजकीय नेते वरुण गांधी हे आहेत. अरुणा यांनी समीक्षक, लेखक, संपादक, चित्रकार, माहितीपट निर्माता, विविध संस्थांचे विश्वस्त, अनेक पॅनेलचे सदस्य अशा विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. ‘आशियाई चित्रपटाची वाहक’ म्हणून त्यांनी ओळख निर्माण केली. दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या ‘सिनेमाया : द एशियन फिल्म क्वार्टरली’ या नियतकालिकेच्या संस्थापक-संपादक त्या होत्या. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेल्या ‘नेटपॅक’ या संस्थेची स्थापना करण्याचे श्रेय अरुणा यांना जाते. आशियाई चित्रपटांसाठी काम करणारी ही विश्वव्यापी संघटना आहे.

# भारत आवडत नसेल, तर काम करू नका!

## दिल्ली उच्च न्यायालयाने ‘विकिपीडिया’ला सुनावले

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**



**‘एएनआय’** या वृत्तसंस्थेच्या नोंदीतील संपादनांची माहिती रोखल्याबद्दल दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी विकिपीडिया या लोकप्रिय संकेतस्थळाला न्यायालयाचा अवमान नोटीस बजावली. भारतीय कायद्याचे पालन करा. तुम्हाला जर भारत आवडत नसेल, तर भारतात काम करू नका. आम्ही केंद्र सरकारला तुमचे संकेतस्थळ बंद करायला सांगू,’’ अशा शब्दांत उच्च न्यायालयाने विकिपीडियाला सुनावले.

वृत्तसंस्थेची माहिती असलेल्या पृष्ठावर काही संपादने करण्यास परवानगी दिल्याबद्दल ‘एएनआय’ने विकिपीडियावर बदनामीचा दावा करून दाखल केलेल्या खटल्याची सुनावणी न्यायालयात सुरू आहे. कथित संपादनात ‘एएनआय’ला भारत सरकारचे ‘प्रचार साधन’ म्हणून संबोधले गेले. न्यायालयाने विकिपीडियाला संपादने करणाऱ्या तीन खात्यांबद्दल तपशील उघड करण्याचे आदेश दिले होते, परंतु एएनआयने आज दावा केला आहे की हे उघड झाले नाही. त्यानंतर न्यायालयाने विकिपीडियाची कानउघाडणी केली.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या, उथळसर प्रभाग समिती अंतर्गत पायाभूत सुविधांसाठी विशेष अनुदान या लेखाशिर्षकाअंतर्गत ५ कामांची ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय /निमशासकिय /सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम /स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली /सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना व निविदाप्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे https://mahatenders.gov.in संकेत स्थ्ळावर अनु.क्र. १ ते ५ साठी दि.०६.०९.२०२४ ते दिनांक १३.०९.२०२४ पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा महानगरपालिकेचे संकेतस्थळावर दि. १३.०९.२०२४ रोजी सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दिनांक १८.०९.२०२४ रोजी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/सा.बा-उ.प्र.स /४४५/२०२४-२५ — सही/-
दि.०५.०९.२०२४ — कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** — ठाणेमहानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

क्लस्टर सेल, शहर विकास विभाग

निविदा सूचना

“ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नागरी समूह विकास योजनेच्या अंमलबजावणी साठी प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (Project Implementation Unit) ची नियुक्ती करणे” या कामाची निविदा ई- टेंडरींग प्रणाली द्वारे ठाणे महानगपालिका, ठाणे यांच्या मार्फत प्रसिद्ध करण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र www.mahatender.gov.in या संकेत स्थळावर दि. ०६.०९.२०२४ ते दि. १८.०९.२०२४ वेळ दु. १२.०० वाजे पर्यंत उपलब्ध राहणार असून, निविदा पूर्व बैठक दि. १२.०९.२०२४ रोजी सहाय्यक संचालक नगर रचना, क्लस्टर सेल, ठाणे महानगरपालिका, ठाणे ह्यांच्या कार्यालयात दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेली आहे. सदर निविदा दि. १८.०९.२०२४ रोजी दु. ५.०० वाजे पर्यंत ऑनलाईन भरता येईल. सदर ई- निविदा शक्य झाल्यास दि.१९.०९.२०२४ रोजी ३.०० वाजता उघडण्यात येईल. सदर निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त सो. याजकडे अबाधित असून, त्यांचा निर्णय सर्व निविदाकरांवर अंतिम व कायद्याने बंधनकारक राहील.

ठामपा/पिआरओ/क्लस्टरसेल/४४३/२०२४-२५ — सही/-
दि: ०५.०९.२०२४ — सहाय्यक संचालक नगररचना
plsvisitourofficialweb-site — क्लस्टर सेल
www.thanecity.gov.in — ठाणेमहानगरपालिका, ठाणे

**यूबीएस एजी**

**नोंदणीकृत कार्यालय:** १० मजला, सीजे हाऊस, प्लॉट एफ, शिवसागर इस्टेट, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई – ४०००१८.
**दूरध्वनी क्रमांक:** ९१–२२–६७७७ ३४००,
**ई–मेल:** list.investorgrievance@credit-suisse.com
**संकेतस्थळ:** www.credit-suisse.com/in

**सार्वजनिक सूचना**

संदर्भ क्र. INBI00001212 धारक १७ जानेवारी, २०२० दिनांकित नोंदणी प्रमाणपत्राच्या परिभाषेमध्ये बँकर टू इश्यू (‘‘**बीटीआय**’’) म्हणून भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळकडे (‘‘**सेबी**’’) नोंदणीकृत पूर्वीची क्रेडिट सुइस एजी, मुंबई शाखा (‘‘**सीएस एजी मुंबई शाखा**’’) वतीने, युबीएस एजी, मुंबईद्वारे समस्त जनतेला याद्वारे सूचना देण्यात येत आहे.

ज्यांनी ३१ मे, २०२४ पासून सीएस एजीचे (सीएस एजी, मुंबई शाखा समाविष्ट’’) चे कार्यचलन आत्मसात केले आहे, युबीएस एजी, हयात असलेले अस्तित्वासोबत, युबीएस एजी सह आणि मध्ये विलिनिकरणाच्या अनुरोधाने क्रेडीट सुइस एजी (‘‘**सीएस एजी** ’’) चे अस्तित्व संपुष्टात आले आहे.

उपरोक्तच्या परिणामस्वरूप, आवश्यक नियामकाच्या मंजुरीच्या प्राप्तीनंतर पूर्वीच्या सीएस एजी मुंबई शाखेचे बीटीआय कार्य युबीएस एजी त्यांच्या मुंबईमधील शाखा कार्यालयाद्वारे कार्यान्वीत करेल. तद्नुसार, युबीएस एजीने सेबीकडे पूर्वीच्या सीएस एजी मुंबई शाखेच्या नावावरील उपरोक्त नमूद बीटीआय नोंदणी स्वाधीन केली आहे.

या संदर्भातील कोणताही पत्रव्यवहार/संपर्क नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता १० वा मजला, सीजे हाऊस, प्लॉट एफ, शिवसागर इस्टेट, डॉ. ॲनी बेजंट रोड, वरळी, मुंबई, महाराष्ट्र – ४०००१८ येथे पाठवावे.

**युबीएस एजी, मुंबई शाखा** करता
हस्ता/
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**

**दिनांक :** सप्टेंबर ०६, २०२४
**स्थळ :** मुंबई

**कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**
**(म्हाडाचा घटक)**
म्हाडा MHADA
**कार्यकारी अभियंता - १, कोंकण मंडळ**

**ई-लिलाव (E-Auction) मागविण्याबाबत**

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा घटक) यांच्याकडून स्वारस्य असणाऱ्या व्यक्ति/संस्था यांचेकडून खालील नमूद रहिवास भूखंडाचे सद्यस्थितीतील पूर्ण चटई क्षेत्रासहीत ई-लिलाव (E-Auction) पध्दतीने देकार मागविण्याचे प्रस्तावित आहे.

- मौजे माजिवडे, सेक्टर ४, ठाणे येथील वर्तकनगर म्हाडा अभिन्यासातील भूखंड क्र. "C" (अस्तित्वातील इमारत क्र. ५७ ते ६१(पैकी)) म्हणून दर्शविण्यात आलेला आहे.
- कामाची व्याप्ती व पात्रता निकषाबाबत माहिती **www.mhada.gov.in** व **eauction.mhada.gov.in** या संकेतस्थळावरील (Web Portal) lottery मधील E-Auction या Tab वर उपलब्ध आहे. पात्रता निकषामध्ये पात्र ठरलेल्या अर्जदारांनाच पुढील निवडीच्या/वितरणाच्या कार्यवाहीत ग्राह्य धरण्यात येईल.
- ई-लिलाव (E-Auction) ही प्रक्रिया ऑनलाईन आहे. ई-लिलाव अर्जाकरीता **www.mhada.gov.in** व **eauction.mhada.gov.in** या संकेतस्थळावर (web site), visit / login दि. ११/०९/२०२४ पासून करता येईल.

| क्र. | विषय | विश्लेषण |
|---|---|---|
| ०१ | प्रकल्पाचे नाव | सर्व्हे क्र. २०९, हिस्सा क्र.१(पै) मौजे माजिवडे, सेक्टर ४, ठाणे या वर्तकनगर म्हाडा अभिन्यासातील भूखंड क्र. 'C' (अस्तित्वातील इमारत क्र. ५७ ते ६१ (पैकी)) ची Lease वर विक्री व उपलब्ध संपूर्ण चटई क्षेत्रफळाची विक्री. |
| ०२ | E-Auction Document uploading Date | ११/०९/२०२४ ते १०/१०/२०२४ |

कोणतेही कारण न देता E-Auction स्विकारण्याचे अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. उपाध्यक्ष / म्हाडा यांना राहतील.

स्थळ : मुंबई
**सही/-**
**कार्यकारी अभियंता-१**
**कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई**
CPRO/A/656

**कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**
**(म्हाडाचा घटक)**
म्हाडा MHADA
**कार्यकारी अभियंता - १, कोंकण मंडळ**

**ई-लिलाव (E-Auction) मागविण्याबाबत**

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा घटक) यांच्याकडून स्वारस्य असणाऱ्या व्यक्ति/संस्था यांचेकडून खालील नमूद रहिवास भूखंडाचे सद्यस्थितीतील पूर्ण चटई क्षेत्रासहीत ई-लिलाव (E-Auction) पध्दतीने देकार मागविण्याचे प्रस्तावित आहे.

- मौजे माजिवडे, सेक्टर ४, ठाणे येथील वर्तकनगर म्हाडा अभिन्यासातील भूखंड क्र. "B" (अस्तित्वातील इमारत क्र. ५१, ५२ व ५३ चा भूखंड) म्हणून दर्शविण्यात आलेला आहे.
- कामाची व्याप्ती व पात्रता निकषाबाबत माहिती **www.mhada.gov.in** व **eauction.mhada.gov.in** या संकेतस्थळावरील (Web Portal) lottery मधील E-Auction या Tab वर उपलब्ध आहे. पात्रता निकषामध्ये पात्र ठरलेल्या अर्जदारांनाच पुढील निवडीच्या/वितरणाच्या कार्यवाहीत ग्राह्य धरण्यात येईल.
- ई-लिलाव (E-Auction) ही प्रक्रिया ऑनलाईन आहे. ई-लिलाव अर्जाकरीता **www.mhada.gov.in** व **eauction.mhada.gov.in** या संकेतस्थळावर (web site), visit / login दि. ११/०९/२०२४ पासून करता येईल.

| क्र. | विषय | विश्लेषण |
|---|---|---|
| ०१ | प्रकल्पाचे नाव | सर्व्हे क्र. २११, हिस्सा क्र.१(पै), २(पै), ४(पै) व ५(पै) आणि सर्वे क्र. २१२ हिस्सा क्र.३(पै) मौजे माजिवडे, सेक्टर ४, ठाणे या वर्तकनगर म्हाडा अभिन्यासातील भूखंड क्र. 'B' (अस्तित्वातील इमारत क्र. ५१, ५२ व ५३ चा भूखंड) ची Lease वर विक्री व उपलब्ध संपूर्ण चटई क्षेत्रफळाची विक्री. |
| ०२ | E-Auction Document uploading Date | ११/०९/२०२४ ते १०/१०/२०२४ |

कोणतेही कारण न देता E-Auction स्विकारण्याचे अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. उपाध्यक्ष / म्हाडा यांना राहतील.

स्थळ : मुंबई
**सही/-**
**कार्यकारी अभियंता-१**
**कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई**
CPRO/A/657

**कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**
**(म्हाडाचा घटक)**
म्हाडा MHADA
**कार्यकारी अभियंता - १, कोंकण मंडळ**

**ई-लिलाव (E-Auction) मागविण्याबाबत**

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा घटक) यांच्याकडून स्वारस्य असणाऱ्या व्यक्ति/संस्था यांचेकडून खालील नमूद रहिवास भूखंडाचे सद्यस्थितीतील पूर्ण चटई क्षेत्रासहीत ई-लिलाव (E-Auction) पध्दतीने देकार मागविण्याचे प्रस्तावित आहे.

- मौजे माजिवडे, सेक्टर ४, ठाणे येथील वर्तकनगर म्हाडा अभिन्यासातील भूखंड क्र. "A" (अस्तित्वातील इमारत क्र. १४ व १६ चा भूखंड) म्हणून दर्शविण्यात आलेला आहे.
- कामाची व्याप्ती व पात्रता निकषाबाबत माहिती **www.mhada.gov.in** व **eauction.mhada.gov.in** या संकेतस्थळावरील (Web Portal) lottery मधील E-Auction या Tab वर उपलब्ध आहे. पात्रता निकषामध्ये पात्र ठरलेल्या अर्जदारांनाच पुढील निवडीच्या/वितरणाच्या कार्यवाहीत ग्राह्य धरण्यात येईल.
- ई-लिलाव (E-Auction) ही प्रक्रिया ऑनलाईन आहे. ई-लिलाव अर्जाकरीता **www.mhada.gov.in** व **eauction.mhada.gov.in** या संकेतस्थळावर (web site), visit / login दि. ११/०९/२०२४ पासून करता येईल.

| क्र. | विषय | विश्लेषण |
|---|---|---|
| ०१ | प्रकल्पाचे नाव | सर्व्हे क्र. २०८, हिस्सा क्र.४(पै), ५(पै), ६(पै) व ७(पै) मौजे माजिवडे, सेक्टर ४, ठाणे या वर्तकनगर म्हाडा अभिन्यासातील भूखंड क्र. 'A' (अस्तित्वातील इमारत क्र. १४ व १६ चा भूखंड) ची Lease वर विक्री व उपलब्ध संपूर्ण चटई क्षेत्रफळाची विक्री. |
| ०२ | E-Auction Document uploading Date | ११/०९/२०२४ ते १०/१०/२०२४ |

कोणतेही कारण न देता E-Auction स्विकारण्याचे अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. उपाध्यक्ष / म्हाडा यांना राहतील.

स्थळ : मुंबई
**सही/-**
**कार्यकारी अभियंता-१**
**कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई**
CPRO/A/655

PLATINUM.
**प्लॅटिनम इंडस्ट्रीज लिमिटेड**
(पूर्वीची प्लॅटिनम इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड)
**CIN :** U24299MH2020PLC341637
**संपर्क क्र.:** ०२२-४९७३२८१८ **ईमेल :** compliance@platinumindustriesltd.com
**वेबसाइट :** www.platinumindustriesltd.com
**नोंद. पत्ता :** युनिट क्र. ८४१, चौथा मजला, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क-८, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पू.), मुंबई-४०० ०९३, महाराष्ट्र.

**व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/इतर दृक्श्राव्य पद्धतींनी घेण्यात येणार असलेल्या ०४थ्या वार्षिक आमसभेची सूचना**

याद्वारे सूचित करण्यात येते की, प्लॅटिनम इंडस्ट्रीज लिमिटेड (‘कंपनी’) च्या सभासदांची ०४थी वार्षिक आमसभा (‘एजीएम’) शुक्रवार, दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी स. ११.०० वा. (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/इतर दृक्श्राव्य पद्धतींनी (‘व्हीसी/ओएव्हीएम’) घेण्यात येईल.

कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने इतर परिपत्रकांसह दि. २८ डिसेंबर २०२२ रोजीच्या सुधारित परिपत्रक क्र. १०/२०२२ आणि दि. ५ जानेवारी २०२३ रोजीच्या सेबी परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/4 अन्वये एखाद्या सामायिक ठिकाणी सभासदांनी उपस्थित न होता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (‘व्हीसी’) किंवा इतर दृक्श्राव्य पद्धतींनी (‘ओएव्हीएम’) वार्षिक आमसभा घेण्याची परवानगी दिलेली आहे. कंपनी अधिनियम, २०१३ (‘अधिनियम’), सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (‘लिस्टिंग रेग्युलेशन्स’) आणि एमसी परिपत्रकांचे पालन करीत कंपनीची ४थी एजीएम व्हीसी/ ओएव्हीएमच्या माध्यमातून घेण्यात येत आहे.

एमसीए आणि सेबी यांनी जारी केलेल्या वर नमूद परिपत्रकांचे पालन करीत ज्यांचे ई-मेल आयडी रजिस्ट्रार व समभाग हस्तांतरण एजंट/डिपॉझिटरी पार्टिसिपंट/डिपॉझिटरीकडे नोंदविलेले आहेत अशा सर्व सभासदांना आणि इतर सर्व पात्र व्यक्तींना इतर बाबींसह दूरस्थ ई-मतदान व ई-मतदानाची पद्धत व प्रक्रिया दर्शविणाऱ्या कंपनीच्या ०४थ्या एजीएमच्या सूचनेसह मंडळाचा अहवाल, लेखापरीक्षकांचा अहवाल आणि त्यासोबत जोडावयाच्या इतर दस्तावेजांसह वित्तीय विवरणे (स्वतंत्र व एकत्रित) असलेला ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल पाठविण्यात आलेला आहे.

सभासदांनी लक्षात घ्यावे की, ०४थ्या एजीएमची सूचना आणि २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइटवर म्हणजे www.platinumindustriesltd.com येथे आणि स्टॉक एक्स्चेंजच्या म्हणजे बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवर www.bseindia.com येथे आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाइटवर www.nseindia.com येथे तसेच बिगशेअर सर्व्हिसेस प्रा.लि.च्या वेबसाइटवर https://ivote.bigshareonline.com/ येथेसुद्धा उपलब्ध असेल.

सुधारित कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २० सह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद १०८ मधील तरतुदी, सेक्रेटरियल स्टँडर्ड ऑन जनरल मीटिंग्ज (SS-२), सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस्) रेग्युलेशन्स, २०१५ मधील नियम ४४ आणि एमसीए परिपत्रके व सेबी परिपत्रकांचे पालन करीत एजीएमच्या सूचनेनुसार करावयाच्या कामकाजाच्या संदर्भात इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सुविधा आपल्या सभासदांना उपलब्ध करून देण्यास कंपनीस आनंद होत आहे. यासाठी, कंपनीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करता यावे म्हणून बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांची नियुक्ती केली आहे. बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद्वारे दूरस्थ ई-मतदानाचा वापर करून मतदान करण्यासाठी तसेच एजीएमच्या दिनांकास ई-मतदान प्रणालीचा वापर करून मतदान करण्यासाठी सभासदांना सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

कंपनीच्या संचालक मंडळाने मतदान प्रक्रिया योग्य व पारदर्शक पद्धतीने पार पडावी, यासाठी मे. मयंक अरोरा ॲण्ड कं., कंपनी सचिव (सभासदत्व क्र. FCS १०३७८ आणि सीपी क्र. १३६०९) यांची नियुक्ती केलेली आहे.

सर्व सभासदांना याद्वारे सूचित करण्यात येते की :

१. एजीएमच्या सूचनेत नमूद कामकाज इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदानाच्या माध्यमातून करण्यात येईल;
२. कट-ऑफ दिनांकास, म्हणजे शुक्रवार, दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी ज्यांचे नाव सभासद नोंदवहीमध्ये नोंदविलेले असेल, त्यांनाच दूरस्थ ई-मतदान सुविधेचा लाभ घेता येईल किंवा एजीएममध्ये मतदान करता येईल;
३. कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे ज्या समभागधारकांचे ईमेल आयडी नोंदविलेले आहेत, त्यांना एजीएमची सूचना आणि इतर दस्तावेज पाठविण्याचे काम कंपनीने गुरुवार, दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी पूर्ण केले आहे.
४. दूरस्थ ई-मतदान कालावधी मंगळवार, दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी (स. ९.०० वा.) सुरू होईल आणि गुरुवार, दि. २६ सप्टेंबर २०२४ रोजी (सायं. ५.०० वा.) समाप्त होईल. सभासदांना एजीएममध्ये व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुरू असताना इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीच्या माध्यमातून मतदानासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल आणि ज्या सभासदांनी दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून मतदान केलेले नसेल त्यांना एजीएम सुरू असताना आपला मतदानाचा हक्क बजावता येईल.
५. कट-ऑफ दिनांकास, म्हणजे शुक्रवार, दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी छापील स्वरूपातील किंवा अमूर्त स्वरूपातील समभाग धारण करणाऱ्या सभासदांनाच दूरस्थ ई-मतदान किंवा एजीएममध्ये ई-मतदानाच्या सुविधेचा लाभ घेता येईल.
६. कट-ऑफ दिनांकाच्या, म्हणजे शुक्रवार, दि. २० सप्टेंबर २०२४ च्या कामकाजाच्या वेळा संपतेवेळी छापील स्वरूपातील किंवा अमूर्त स्वरूपातील समभाग धारण करीत असलेल्या आणि दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून मतदान न केलेल्या कंपनीच्या सभासदांना एजीएममध्ये ई-मतदानाच्या माध्यमातून मतदान करता येईल. दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून आपला मतदानाचा हक्क बजावणाऱ्या सभासदांना सभेमध्ये सहभागी होता येईल, परंतु सभेत पुन्हा मतदान करता येणार नाही. एखाद्या सभासदाने एकदा का मतदान केले की त्यांना ते पुढे बदलता येणार नाही.
७. समभागधारक/गुंतवणूकदारांना ई-मतदानाशी संबंधित काही प्रश्न असल्यास ते https://ivote.bigshareonline.com येथे डाऊनलोड सेक्शनमध्ये उपलब्ध असलेले Frequently Asked Questions (‘FAQs’) आणि i-Vote ई-मतदान मॉड्यूल पाहू शकतात किंवा आपण ivote@bigshareonline.com येथे ईमेल करू शकता किंवा आम्हाला १८०० २२ ५४ २२ येथे कॉल करू शकता.
८. सभासदांना विनंती आहे की, त्यांनी आपले सर्वांत अद्यतन ईमेल आयडी कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे नोंदवून ठेवावेत, जेणेकरून त्यांना वेळोवेळी माहिती पाठवता येईल.
९. दूरस्थ ई-मतदान आणि एजीएममध्ये करण्यात येणाऱ्या मतदानाचे निकाल एजीएम समाप्त झाल्यावर फारतर अठ्ठेचाळीस तासांत घोषित करण्यात येतील. जाहीर केलेले निकाल ताबडतोब परिनिरीक्षकांच्या अहवालासह कंपनीच्या वेबसाइटवर म्हणजे www.platinumindustriesltd.com येथे टाकण्यात येतील आणि बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांना कळविण्यात येतील.

याद्वारे असेही सूचित करण्यात येते की, कंपनी अधिनियम, २०२३ मधील अनुच्छेद ९१ च्या तरतुदी आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेले नियम आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ मधील नियम ४२ च्या अनुषंगाने एजीएमसाठी कंपनीची सभासद नोंदवही आणि समभाग हस्तांतरण पुस्तके शनिवार, दि. २१ सप्टेंबर २०२४ ते शुक्रवार, दि. २७ सप्टेंबर २०२४ पर्यंत (दोन्ही दिवस समाविष्ट) बंद ठेवण्यात येतील.

**प्लॅटिनम इंडस्ट्रीज लिमिटेडकरिता**
स्वा/-
**कृष्णा दुष्यंत राणा**
व्यवस्थापकीय संचालक
(DIN : ०२०७१९१२)

स्थान : मुंबई
दिनांक : ०५ सप्टेंबर २०२४